करीत असे तेव्हा ते मला माझ्या कृतीच्या पध्दतीबद्दल कधीच जाब विचारत नव्हते आणि जेव्हा मी काही काम करीत नसे तेव्हा ते मला ते काम न करण्याचे कारणही विचारीत नसत. ते सर्व मानवांचे मित्र होते.'"

प्रेषितांच्या (स.) एकदा, एका व्यक्तिकडून अपमानित झाल्यानंतर प्रेषितांच्या (स.) पत्नी रगवल्या होत्या.

प्रेषितांनी (स.) त्यांना सल्ला दिला होता- ''शांत आणि सभ्यतेने वागा, आयेशा, कारण अल्लाहला प्रत्येक व्यवहारात सभ्यता आवडते.'' त्यांनी असेही म्हटले आहे की, सभ्यता दाखवा, जर कोणत्याही गोष्टीत सभ्यता दिसली तर त्याचे सौंदर्य वाढते आणि त्या गोष्टीतून सभ्यतेला अलिप्त केल्यास ती गोष्ट अपूर्ण राहते.'"

## विनम्रता-

प्रेषितांप्रतीचा (स.) आदर दाखविण्यासाठी उठून उभे राहणाऱ्या लोकांनी तसे करू नये, असे प्रेषित सांगत असत. लोकांच्या जमावामध्ये उच्च स्थानावर नव्हे तर सापडेल त्या ठिकाणी प्रेषित बसत असत. आपल्या सहकाऱ्यांपेक्षा उठून दिसावे, यासाठी त्यांनी कधी वेगळे कपडे घातले नाहीत.

> ''कृपावंताचे (अस्सल) दास ते आहेत जे जमिनीवर नम्रपणे चालतात आणि अडाणी त्यांच्या तोंडी लागले तर म्हणतात की तुम्हाला 'सलाम'.''
> (कुरआन-२५:६३)

ते गरजू आणि गरीबांसोबत मिसळायचे; ते वृध्दांसोबतही बसायचे आणि विधवांना मदत करायचे.

आपल्या सहकाऱ्यांना संबोधित करताना ते म्हणाले: ''तुम्ही विनम्र असले पाहिजे, असे अल्लाहने मला सांगितले आहे. कुणीही एकमेकांपेक्षा वरचढ ठरणाऱ्या बढाया मारू नये आणि कोणाचेही दमन करू नये.''

त्यांची विनम्रता इतकी होती की, लोक आपली प्रार्थना करतील, अशीही त्यांना भीती असे. तो हक्क फक्त अल्लाहचा आहे. ''मेरीपुत्र ईसा यांची खिश्चन जसे भक्ती करतात तशी तुम्ही माझी करू नका. मी फक्त ईश्वराचा सेवक आहे; त्यामुळे मला अल्लाहचा सेवक आणि त्याचा दूत असे म्हणा."

## एक आदर्श पती-

> ''त्यांच्याशी (पत्नींशी) चांगले वर्तन राखा.''
> (कुरआन-४:१९)

प्रेषितांची प्रिय पत्नी आपल्या थोर म्हणतात- ''ते नेहमीच मला घरच्या कामात मदत करीत; कधी कपडेही धुवत, स्वतःच्या चपला दुरूस्त करीत आणि झाडूनही काढीत. ते



आपल्याकडील पाळीव प्राण्यांना खाऊ खालीत, त्यांचे संरक्षण करीत, दूध काढीत.''

ते स्वतः समर्पित पती बनून स्वस्थ राहिले नाहीत तर आपल्या सहकाऱ्यांनाही आपले अनुकरण करण्यास सांगत. ''जे नीतीमान आहेत तेच सर्वोत्तम श्रध्दावान आहेत. आणि त्यातील आपल्या पत्नीशी चांगले वर्तन करणारेच सर्वोत्तम आहेत."

## एक उत्कृष्ट उदाहरण-

मुहम्मद (स.) आपले जीवन कसे जगले, याची वरील केवळ एक झलक आहे. प्रसारमाध्यमांत रंगविण्यात आलेली इस्लामची प्रतिमा आणि इस्लामबद्दलचे सातत्यपूर्ण चुकीचे आकलन यामुळे वर उल्लेख करण्यात आलेली दयाळू आणि कणवाळूपणाची उदाहरणे अनेकांना आश्चर्यकारक वाटतील. कुरआन आणि प्रेषित मुहम्मद (स.) यांची शिकवण व कृतीवर आधारलेल्या इस्लामला समजून घेताना काही मुस्लिमांच्या गैरकृतीतून पारखू नये.

> ''आणि निःसंशय तुम्ही (हे मुहम्मद) फार (उत्तम) स्वभावावर आहात.''
> (कुरआन-६८:४)

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील भारताचे थोर राजकीय आणि धार्मिक नेते महात्मा करमचंद गांधी यांनी म्हटले आहे-: ''कडक साधेपणा, प्रेषितांचे स्वयंसामर्थ्य, त्यांची आपल्या वचनांबाबत पापभीरूता, त्यांचे आपल्या मित्र व सहकाऱ्यांप्रतीची अतीव समर्पितता, त्यांची निर्भयता, त्यांचे शौर्य, त्यांची ईश्वरावर आणि आपल्या मोहीमेवर पूर्ण श्रध्दा प्रकर्षाने दिसून येते. त्यांनी तलवारीने नव्हे या सर्व सामर्थ्याने सर्व अडचणींवर मात केली.''

प्रसिध्द ब्रिटिश नाटककार जॉर्ज बर्नांड शॉ म्हणतात- ''या जगाला मुहम्मदसारख्या माणसाची नितांत गरज आहे. मध्ययुगीन काळातील धार्मिक लोकांनी अज्ञान आणि पूर्वग्रहामुळे मुहम्मद यांच्याकडे खिश्चनांचे शत्रू म्हणून पाहिले. मात्र, या माणसाची कथा ऐकल्यानंतर मला ते आश्चर्यकारक आणि चत्मकारिक वाटले.

आणि मी या निष्कर्षाला आलो की, ते खिश्चनांचे शत्रू नव्हे तर मानवतेचे कैवारी होते. मुहम्मद यांना आजच्या जगाचे नियंत्रण करण्यास दिले असते तर त्यांनी आमचे सर्व समस्या सोडवून या जगाला नितांत आवश्यकता असलेली शांतता आणि सुख दिले असते.''

IQRA THE TRUTH
Reaching the message of Allah to all mankind.

Published by :
IQRA THE TRUTH FOUNDATION

**Contact :** 9970834402 / 9773289009
**Website :** www.iqrathetruth.com **Email :** info@iqrathetruth.com



# प्रेषित मुहम्मद
(कृपा आणि सलामती असो त्यांच्यावर)

# तुम्ही यांना जाणलेच पाहिजे

IQRA THE TRUTH
Reaching the message of Allah to all mankind.

www.iqrathetruth.com

# मुहम्मद ﷺ कोण आहेत?

> ''वस्तुत: तुम्हा लोकासाठी अल्लाहचे पैंगंबर एक उत्कृष्ट आदर्श आहेत, त्या प्रत्येक माणसासाठी जो अल्लाह व मरणोत्तर जीवनातील मोबदल्याच्या दिवसाचा उमेदवार असेल आणि बहुतांशी अल्लाहचे स्मरण करीत असेल.''
> (कुरआन-३३:२१)

एकमेव खऱ्या ईश्वराची (अरबीत अल्लाह) प्रार्थना करण्यासाठी आणि त्याच्या आज्ञापालनासाठी पृथ्वीवर पाठविण्यात आलेल्या प्रेषितांपैकी मुहम्मद (स.) हे शेवटचे प्रेषित असल्याची मुस्लिमांची श्रध्दा आहे. या प्रेषितांमध्ये आदम, नूह, इब्राहीम, इस्माईल, इसहाक, मूसा, दाऊद, सुलेमान आणि ईसा (या सर्वांना शांती लाभो) आदींचा समावेश आहे.

जसे मूसा (अ.) यांच्यासह तोराह (मूसा यांना पाठवलेले फेरफारविरहीत मूळ ईशज्ञान), ईसा (अ.) यांच्यासह गॉस्पेल (फेरफारविरहीत मूळ ईशज्ञान-विद्यमान आवृत्ती नाही) पाठविण्यात आले मुहम्मद (स.) यांना अल्लाहच्या शिकवणीनुसार आचरण कसे करावे, हे सांगण्यासाठी त्यांच्यासोबत कुरआन पाठविण्यात आले, अशी मुस्लिमांची श्रध्दा आहे.

प्रेषितांची (स.) पत्नी आयेशा (र.) यांना प्रेषितांचे (स.) वर्णन करण्यास सांगण्यात आले असता, त्या म्हणाल्या की, ते **चालते-बोलते कुरआन होते**. म्हणजेच ते त्यांनी परिश्रमपूर्वक आपल्या दैनंदीन जीवनात कुरआनाच्या महान शिकवणीचा अंगिकार केला. त्यांनी या महान शिकवणुकींना महान कृतींमध्ये कसे उतरविले, हे आम्ही दाखविणार आहोत.

## दयेचे मिशन-

> ''आणि आम्ही तुम्हाला (मुहम्मद (स.) ला) समस्त विश्वाकरीता दया कृपा बनवून पाठविले आहे.''
> (कुरआन-२१:१०७)

नमाज अदा करणे, उपवास करणे आणि दान देण्यास सांगण्याबरोबरच एखाद्याचा ईश्वरावरील विश्वासाचा परिणाम दुसऱ्या माणसासोबतच्या वर्तनावरही झाला पाहिजे, याची शिकवण प्रेषितांनी (स.) दिली आहे. त्यांनी सांगितले की, **''ज्यांचे चारित्र्य उत्तम आहे तेच उत्तम आहेत.''**

श्रध्दा आणि कृती यांच्यामधील नात्यावर प्रेषितांनी (स.) भर दिला आहे.

**संक्षिप्तीकरण:**
(स.): सल्लल्लाहु अलैहि वसल्लम - (कृपा आणि सलामती असो त्यांच्यावर)
(अ.): अलैहिस्सलाम - (सलामती असो त्यांच्यावर)
(र.): र ज़ियल्लाहु अन्हु - (अल्लाह त्यांच्यावर राजी झाले)



उदाहरणार्थ: **''ज्यांचा अल्लाह आणि कयामतवर (अंतिम निवाड्याच्या दिवसावर) विश्वास आहे त्यांनी आपल्या शेजाऱ्यांना दुखवू नये, ज्यांचा अल्लाह आणि कयामतवर विश्वास आहे त्यांनी आपल्या पाहुण्यांची उदारतेने सेवा करावी, आणि ज्यांचा अल्लाह आणि कयामतवर विश्वास आहे त्यांनी जे योग्य आहे तेच बोलावे किंवा शांत राहावे.''**

अंतिम प्रेषितांनी (स.) मानवाला दया करणे आणि परस्परांचा आदर करण्याची शिकवण दिली. उदा: **'' जो दुसऱ्यांना दया दाखवत नाही, त्याला दया केली जाणार नाही.''**

एकदा लोकांनी प्रेषितांना अल्लाहकडे अश्रध्दाळूंना शिक्षा करण्यासाठी प्रार्थना करण्याची विनंती केली होती, त्यावेळी प्रेषित म्हणाले की, **''मला कुणाला शिक्षा करण्यासाठी नव्हे तर दया दाखवण्यासाठी पाठविण्यात आले आहे.''**

## क्षमाशीलता-

> ''त्यांना माफ केले पाहिजे आणि त्याको कानाडोळा केला पाहिजे, काय तुम्हाला आवात नाही की अल्लाहने तुम्हाला माफ करावे? आणि अल्लाहचा गुण असा आहे की तो क्षमाशील व दयाळू आहे.''
> (कुरआन-२४:२२)

प्रेषित (स.) हे सर्व लोकांना अत्यंत क्षमाशील आणि कणवाळू होते. जर कुणी त्यांना अर्वाच्च बोलले तरी ते त्याला क्षमा करीत; तो व्यक्ती जितका कठोर असे तितके प्रेषित संयमी बनत. ते अत्यंत दयाळू आणि क्षमाशील होते; विशेषत: सूड घेण्याची शक्ती आणि संधी असे तेव्हा त्यांच्यातील हे गुण प्रकर्षाने पाहावयास मिळत.

मुहम्मद (स.) हे अत्यंत क्षमाशील होते आणि त्यांच्याविरोधात कितीही मोठा गुन्हा केला तरी ते संबंधित व्यक्तीला माफ करीत. कुरआनच्या खालील आयतीमध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रेषित हे क्षमाशीलतेचा आणि दयाळूपणाचे उत्तम उदाहरण होते....

**''हे पैगंबर (स.), मृदूता आणि क्षमाशीलतेच्या मार्गाचा अंगिकार करा. भलेपणाचे उद्बोधन देत राहा आणि अडाण्यांशी विवाद टाळा.'' (कुरआन-७:१९९)**

## समता-

प्रेषितांच्या (स.) खालील वचनांमध्ये त्यांनी सर्व लोक अल्लाहसमोर समान असल्याची शिकवण दिली आहे.

**''सर्व मानव आदम (अ.) पासून आणि आदम(अ.) मातीपासून बनला आहे. ईशउपासनेव्यतिरिक्त कोणत्याही अरबाला अरबेतरावर,**



**काळ्याला गोऱ्यावर श्रेष्ठत्व नाही.''**

> ''अल्लाहच्या नजरेत तुम्हा सर्वात प्रतिष्ठा सम्पन्न तो आहे, जो सर्वात जास्त (अल्लाहचे) भय बाळगणारा आहे नि:संशय अल्लाह जाणणारा, चांगल्या प्रकारे जाणतो.''
> (कुरआन-४९:१३)

**''ईश्वर तुमच्या दिसण्यावरून किंवा तुमच्या संपतीवरून नव्हे तर तुमच्या हृदयावरून आणि कर्मावरून तुमची पारख करतो.''**

एकदा प्रेषितांच्या (स.) एका सहकाऱ्याने दुसऱ्या सहकाऱ्याला **''काळ्या स्त्रीचा मुलगा!''** असे अपराधी शब्द उच्चारले. तेव्हा प्रेषित (स.) रागावले आणि उत्तरले, **''तिच्या आईच्या काळ्या रंगामुळे तू त्याचा निषेध करतोस? तुझ्यात अजूनही इस्लामपूर्व अज्ञान आहे.''**

## सहनशीलता-

> ''आणि सत्कर्म व दुष्कर्म समान असू शकत नाही वाईट गोष्टीचे भलेपणाने निवारण करा, मग तोच, ज्याच्या व तुमच्या दरम्यान शत्रूता आहे, असा होईल जणू जीवलग मित्र.''
> (कुरआन-४१:३४)

**''जे तुमचे वाईट करतात त्यांचे तुम्ही वाईट करू नका तर त्यांच्याशी क्षमाशील आणि दयाळूपणाने वागा''**. अंतिम प्रेषितांनी (स.) स्वत:वरील हल्लेखोरांना आणि शिवीगाळ करणाऱ्यांशी असेच वर्तन केले. प्रेषितांना (स.) त्यांना दुखावणाऱ्यांचा बदला घेण्याची संधी मिळाली; परंतु, त्यांनी तसे केले नाही, असे अनेकदा घडले.

प्रतिकूलतेमध्ये माणसाने संयम ठेवावा, अशी शिकवण त्यांनी दिली. **''जो आपल्या शक्तीने लोकांवर मात करतो तो शक्तिमान नव्हे, तर जो रागात स्वत:वर नियंत्रण ठेवतो तोच शक्तिमान आहे.''**

संयम आणि सहनशीलतेचा अवलंब करणे म्हणजे मुस्लिमाने आपल्यावरील हल्ल्याच्या वेळी आपला बचाव न करता शांत राहणे नव्हे.

प्रेषित मुहम्मद (स.) यांनी म्हटले आहे की, **''शत्रूला भेटण्याची इच्छा करू नका, पण तुम्ही शत्रूला भेटलाच (तोंड दिलात) तर संयमी राहा.** (शत्रूशी सामना करताना ठामपणे उभे राहा).''

## सभ्यता-

> ''हे पैंगंबर (स.), ही अल्लाहची मोठी कृपा आहे की तुम्ही या लोकांसाठी फार कोमल स्वभावी ठरला आहात. एरवी जर तुम्ही एखादे वेळी शीघ्रकोपी स्वभावी व निष्ठूर असता तर हे सर्वजण तुमच्यापासून विभक्त झाले असते.''
> (कुरआन-३:१५९)

मुहम्मद (स.) यांची सेवा करणाऱ्या सहकाऱ्याने सांगितले आहे की, मुहम्मद (स.) हे आपल्याशी अत्यंत सभ्यतेने वागत. **''मी जेव्हा काही**